# प्रेस नोट

ला.प्र.वि.,वाशिम.
दि.०६.०१.२०२१.

**आलोसे बालाजी भगवान सोनटक्के वय ३५ वर्षे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत तळप बु, पंचायत समिती मानोरा जि.वाशिम यांना ८०००/- रुपयेची लाच स्विकारतांना रंगेहात पकडले बाबत.**

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा, व पत्ता | बालाजी भगवान सोनटक्के वय ३५ वर्षे, ग्रामसेवक, ग्रामपंचायत तळप बु, पंचायत समिती मानोरा जि.वाशिम<br>रा.पिंपळगांव डाकबंगला ता.जि.वाशिम |
| लाचेची रक्कम | ८०००/-रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे आजोबा मधुकर इंगोले (मयत) यांचे नावावर असलेल्या घराची वारस नोंद तक्रारदार, तक्रारदाराचा भाऊ व आई यांचे नावावर करण्याकरीता |
| सापळा अधिकारी | निवृत्ती भिमराव बो-हाडे,<br>पोलीस निरीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम. |

दि. ०५.०१.२०२१ रोजी यातील तक्रारदार पुरुष वय २८ वर्ष व्यवसाय शेती यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे आजोबा मधुकर इंगोले (मयत) यांचे नावावर असलेल्या घराची वारस नोंद तक्रारदार, तक्रारदाराचा भाऊ व आई यांचे नावावर करण्याकरीता आरोपी लोकसेवक बालाजी भगवान सोनटक्के ग्रामसेवक यांनी तक्रारदारास १००००/-रुपये लाचेची मागणी केली आहे. सदर तक्रारीवरुन पंचासमक्ष पडताळणी केली असता आलोसे यांनी तडजोडीअंती ८०००/-रु लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

दि.०६.०१.२०२१ रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे यांनी तक्रारदाराकडुन ८०००/- रु. लाचेची रक्कम स्विकारल्याने, आलोसे यांना ताब्यात घेवुन त्यांचे कडुन लाचेची रक्कम ८०००/- रु. जप्त करण्यात आली. लोकसेवक यांचे विरुध्द भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ (सुधारणा २०१८) प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कारवाई मा.पोलीस अधीक्षक,श्री.विशाल गायकवाड, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती, पोलीस उप अधीक्षक, श्री.एस.व्ही.शेळके, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक निवृत्ती बो-हाडे, अंमलदार पोहेकॉ नितील टवलारकर, आसिफ शेख, पोना अरविंद राठोड, सुनिल मुंदे व चापोकॉ नाविद शेख यांनी केली.

कोणत्याही लोकसेवकाने, खाजगी इसमाने शासकीय कामासाठी लाचेची मागणी केल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम, दुरध्वनी क्रमांक ०७२५२/२३५९३३, टोल फ्रि.नं.१०६४ यावर संपर्क करावा असे आवाहन करण्यात येत आहे.

(एन.बी.बो-हाडे)
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम.

Scanned by TapScanner